मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २०२३ । पान १


# पिंपरी-चिंचवडकरांचा पाणीप्रश्न सुटणार

## लोणावळा येथील मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर पाणी मिळणार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहराचा लोकसंख्या वाढीचा दर आणि सन २०४१ पर्यंतची लोकसंख्या विचारात घेऊन मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी शहरासाठी आरक्षित करण्याची मागणी राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाकडे केली आहे. यासाठी लागण्यात येणारा पुनर्स्थापना खर्च देण्याची तयारी महापालिका प्रशासनाने दाखविली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांना मुळशी धरणातील पाणी शासन देणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराला गेल्या चार वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. शहर चारही बाजूने झपाट्याने वाढत असून, लोकसंख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. शहराची लोकसंख्या आजमितीला २७ लाखांवर पोहोचली आहे. शहरासाठी पवना धरणातून ५१०, आंद्रातून १००, भामा-आसखेड धरणाचे १६७ असे ७७७ दशलक्ष लीटर पाणी आरक्षित आहे. सध्या शहरवासीयांना दिवसाला पवना धरणातून ५१०, चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रातून ७० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १३ असे ५९३ दशलक्ष लीटर पाणी देण्यात येत आहे. त्यानंतरही शहरातील विविध भागांतील सोसायट्यांना कमी दाबाने आणि अपुरा पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. सध्याच्या लोकसंख्या वाढीचा वेग लक्षात घेता २०३१ मध्ये शहराची लोकसंख्या ५२ लाख ७४ हजार तर २०४१ मध्ये ९६ लाख तीन हजार लोकसंख्या होईल, असे अनुमान गृहित धरण्यात आले आहे. या लोकसंख्येला सुमारे १५०० दशलक्ष लीटर पाणी आहे. त्यामुळे भविष्याचे आतापासून नियोजन करणे काळाची गरज आहे. त्यानुसार महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने तयारी सुरू केली आहे. लोणावळा येथील टाटा कंपनीच्या मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर पाणी मिळावे, असे पत्र महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने जलसंपदा विभागाला दिले आहे. पिण्याचे पाण्याचे आरक्षण औद्योगिक, व्यावसायिक व घरगुती या प्रकारामध्ये विभागून देणे आवश्यक आहे. औद्योगिक व व्यावसायिक कारणांसाठी १.५० टक्के व उर्वरीत ९८.५० टक्के घरगुती पिण्याच्या प्रयोजनात वापरले जाणार आहे.



> **“ हराचा लोकसंख्या वाढीचा दर आणि सन २०४१ पर्यंतची लोकसंख्या विचारात घेऊन मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर पाणी शहरासाठी आरक्षित करण्याची मागणी राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाकडे केली आहे. लोकसंख्या वाढीचा विचार करता मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर पाणी आरक्षित करावे, यासाठी जलसंपदा विभागाला पत्र दिले आहे.**
>
> **– श्रीकांत सवणे, मुख्य अभियंता, महापालिका**

# इंद्रायणी ही महाराष्ट्राची ‘पवित्र गंगा’

## आमदार महेश लांडगे यांची नदी प्रदूषणावर लक्षवेधी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू या तीर्थक्षेत्रांना जोडणारी इंद्रायणी म्हणजे महाराष्ट्रातील पवित्र गंगा आहे. संपूर्ण देशभरातील भाविकांच्या श्रद्धास्थानी असलेली ही इंद्रायणी व पिंपरी-चिंचवडची जीवनवाहिनी असलेली पवना नदी प्रदूषणाच्या विळख्यात आहे. या नद्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला पाहिजे, अशी आग्रही मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पिंपरी-चिंचवडची जीवनवाहिनी पवना आणि इंद्रायणी नदी प्रदूषण त्यावर अपेक्षीत उपाययोजना आणि राज्य व केंद्र सरकारची अपेक्षीत कार्यवाही याबाबत आमदार लांडगे यांनी राज्य सरकार आणि संबंधित मंत्रीमहोदय यांचे लक्ष वेधले. आमदार लांडगे म्हणाले की, इंद्रायणी व पवना नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, नदी पात्रालगत



बेकायदेशीरपणे सुरू असलेले भंगार कारखाने आणि रसायनमिश्रीत पाणी नदी सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाईसाठी कठोर धोरण ठरवावे लागेल. त्यासाठी स्वतंत्र अधिकारी किंवा यंत्रणा कार्यान्वयीत करावी लागेल. नदी प्रदूषणाबाबत वेळोवळी पर्यावरण प्रेमी, संस्था संघटनांच्या वतीने आंदोलने करण्यात आली आहे. यावर काहीअंश महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला. पण, पूररेषेच्या आत होणारी बांधकामे थांबवली पाहिजेत. काही नाले थेट नदी पात्रात सोडले आहेत. त्यामुळे नदी प्रदूषित होते आहे. यावर पूर्वी कारवाई होत होती. मात्र, २०१९ नंतर ही कारवाई थांबवली आहे. तसेच, नदी पात्रालगत काही भंगार व्यावसायिकांनी गोदामे घातली आहेत. नदी पात्रालगत भंगार जाळले जाते. त्यातील रसायनमिश्रीत पाणी नदीपात्रात सोडले जाते. त्यावर करावाई झाली पाहिजे. नदी सुधार प्रकल्पासाठी महापालिका प्रशासनाने ९९५ कोटी रुपयांचा ‘डीपीआर’ तयार केला होता. त्याला राज्य सरकारने तत्वत: मान्यता दिली आहे. तो राज्य सरकारकडे पाठवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यास पीसीएमसी, पीएमआरडीए, एमआयडीसी अशा सर्व अस्थापनांद्वारे नदी सुधार प्रकल्पाला चालना देता येईल. यावर राज्याचे कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी याबाबत सकारात्मक उत्तर दिले.

# मोशी येथे किसान-२०२३ कृषि प्रदर्शन उत्साहात

## मालमत्तांचे सर्वेक्षण आणि नवीन मालमत्ता कर नोंदणी अभियान सुरू




**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारतातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन असलेल्या किसान २०२३ या ३२ व्या कृषिप्रदर्शनाचे पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी येथे उद्घाटन करण्यात आले. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे पहिल्या येणार्या शेतकर्यांच्या गटातर्फे हे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या शेतकर्यांचा समावेश होता. हे प्रदर्शन १७ डिसेंबर २०२३ पर्यंत सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत सुरू राहील. १५ एकर प्रदर्शन क्षेत्रावर ४५० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था, नव उद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनात, ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ विभागातील स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत केले आहे. मोबाईलचा वाढता वापर आणि डिजीटल इंडिया उपक्रमांमुळे शेतकऱ्यांशी संवाद साधणे सहज शक्य झाले आहे. यामुळेच उद्योजक नवनवीन सेवा व उत्पादने शेतकऱ्यांसमोर मांडण्यास उत्सुक आहेत. हे उद्योजक प्रामुख्याने बाजारभाव, जल व्यवस्थापन, शेतमालाचे मूल्यवर्धन, जैवतंत्र या क्षेत्रात नवीन संकल्पना घेऊन येत आहेत. या प्रदर्शनात शेतकरी कृषी क्षेत्रात येऊ घातलेले नवीन तंत्रज्ञान व त्यामुळे निर्माण होणाऱ्या संधींची माहिती घेऊ शकतील. प्रदर्शनामध्ये कृषी क्षेत्रातील नवउद्योजकांसाठी स्पार्क या दालनाचा समावेश असणार आहे. ज्यामध्ये नवीन तंत्रज्ञान व नाव कल्पनांना चालना देण्यात येईल. पूर्वनोंदणी : प्रदर्शनाच्या प्रवेशद्वारावर मोबाईल ॲपद्वारे आगाऊ नावनोंदणीची सोय केली आहे.१८ राज्यातील शेतकऱ्यांनी पूर्वनोंदणी केली असून ही संख्या १००,००० ओलांडण्याची अपेक्षा आहे. प्रदर्शकांची माहिती व संपर्क : किसान मोबाईल ॲपवर सहभागी कंपन्या व त्यांच्या उत्पादनांची माहिती उपलब्ध आहे. नावनोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा प्रदर्शक संस्थांशी संवाद प्रदर्शनाच्या आधीपासूनच सुरु झाला आहे.

# स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने वद्यार्थ्यांना ‘फळे व खाऊ वाटप’

## मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने ‘फळे व खाऊ वाटप’ उपक्रम



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते व देशाचे ग्रामविकास मंत्री लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या ७४ व्या जयंतीनिमित्त क्रांतीवीर चापेकर स्मारक समिती संचलित ‘गुरूकुलम्’ मधे शिक्षण घेणाऱ्या भटके, विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने ‘फळे व खाऊ वाटप’ उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीशजी प्रभुणे व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष प्रा.सदाशिव खाडे यांनी मुंडे साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भाजपा शहर उपाध्यक्ष रविंद्र देशपांडे, भाजपा सचिव मधुकर बच्चे, भाजयुमोचे प्रदेश सचिव अजित कुलथे, भटके-विमुक्त आघाडीचे शहराध्यक्ष गणेश ढाकणे, जेष्ठ कार्यकर्ते पाटीलबुवा चिंचवडे, रविंद्र प्रभुणे, तुकाराम चौधरी, नंदूकाका भोगले, प्रदिप सायकर, कैलास सानप, प्रशांत आगज्ञान, सुभाष मालुसरे, धनंजय शाळिग्राम, मुकुंद गुरव, गजानन बावळे, आनंद कुलकर्णी, पल्लवी पाठक, ताई कलापुरे, मिथुन बोरगांव, अतुल कांबळे यांसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# पदपथांच्या दुरवस्थेची उच्च न्यायालयाने घेतली दखल!

## एसआरए पुनर्विकास करण्याचा प्रकार आला समोर



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील पदपथ दुरवस्थेची मुंबई उच्च न्यायालयाकडून दखल घेण्यात आली आहे. पुणे महापालिका, राज्याचा नगरविकास विभाग तसेच नगररचना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, महामेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांची भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र दाखल करावे असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. शपथपत्र सादर करण्यासाठी २७ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून याचिकेवरील सुनावणी १७ जानेवारी रोजी होणार आहे. महापालिकेकडून पादचाऱ्यांचे हक्क दुर्लक्षित केले जात आहेत. शहरात निकृष्ट दर्जाचे पदपथ असून काही ठिकाणी पदपथ खड्डे पडलेल्या, मोडक्या अवस्थेत आहेत. तर काही ठिकाणी पदपथच नसल्याची वस्तुस्थिती आहे. ज्या भागात पदपथ आहेत, त्यावर अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांचे हक्क डावलले जात असल्याचे नमूद करत सामाजिक कार्यकर्त्या कनिझ सुखरानी यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. सत्या मुळ्ये यांच्या मार्फत याचिका दाखल केली होती. त्याची दखल घेत महापालिका आणि महामेट्रोला शपथपत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. शहरातील पदपथांवर विविध प्रकारचे अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना विनाअडथळा चालणे अडचणीचे ठरत आहे. पादचारी मार्गाअभावी रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागत असल्याने अपघाती होत आहेत. महामेट्रोकडून मेट्रो रेल्वे स्थानकांना जोडणाऱ्या प्रवेशद्वारासाठी केलेल्या पायऱ्यांनी पदपथ गिळंकृत केले आहेत. महामेट्रोकडून पदपथांची रुंदी आणि लांबीही कमी करण्यात आली आहे. नगर रस्ता, औंध रस्ता, कर्वे रस्ता, सातारा रस्ता, बाणेर रस्ता, स्वारगेट, पाषाण रस्ता, कोरेगाव पार्क, फर्ग्युसन कॉलेज आणि जंगली महाराज रस्त्यावरील पदपथ फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. तर इंडियन रोड काँग्रेसच्या निकषांनुसार पदपथांची रचना नाही. याचिका दाखल झाल्यानंतरही महापालिकेकडून पदपथ मोकळे करण्यात आले नाहीत. तसेच पदपथांवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली नाही, अशी बाब ॲड. सत्या मुळ्ये यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. शहरातील पदपथ दुरवस्थेची मुंबई उच्च न्यायालयाकडून दखल घेण्यात आली आहे. पुणे महापालिका, राज्याचा नगरविकास विभाग तसेच नगररचना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, महामेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांची भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र दाखल करावे असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. महापालिकेकडून पादचाऱ्यांचे हक्क दुर्लक्षित केले जात आहेत. शहरात निकृष्ट दर्जाचे पदपथ असून काही ठिकाणी पदपथ खड्डे पडलेल्या, मोडक्या अवस्थेत आहेत. तर काही ठिकाणी पदपथच नसल्याची वस्तुस्थिती आहे. ज्या भागात पदपथ आहेत, त्यावर अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांचे हक्क डावलले जात असल्याचे नमूद करत सामाजिक कार्यकर्त्या कनिझ सुखरानी यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. सत्या मुळ्ये यांच्या मार्फत याचिका दाखल केली होती. त्याची दखल घेत महापालिका आणि महामेट्रोला शपथपत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. शपथपत्र सादर करण्यासाठी २७ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून याचिकेवरील सुनावणी १७ जानेवारी रोजी होणार आहे.

# पुणे लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घ्या!

## मुंबई उच्च न्यायालयाचे केंद्रीय निवडणूक आयोगाला आदेश




**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महिन्यांहून अधिक काळापासून रिक्त असलेली पुणे येथील लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले. ही निवडणूक न घेण्याबाबत आयोगाला मिळालेले प्रमाणपत्रही न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने मनमानी, कायद्याचे उल्लंघन करणारे आणि बेकायदा असल्याचे नमूद करून यावेळी रद्द केले.

दरम्यान, अन्य राज्यातील निवडणुका घेण्यात आणि आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीत व्यग्र असल्याने भाजप खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर रिक्त झालेली पुणे येथील लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेणे कठीण झाले होते, असा दावा केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी झालेल्या सुनावणीच्या केला होता. त्यावर, पुण्यात मणिपूरसारखी अशांततेची परिस्थिती होती का ? अशी विचारणा करून न्यायालयाने आयोगाच्या या दाव्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. तसेच, आयोगाचा हा दावा पटण्यासारखे नसल्याचेही सुनावले होते. मणिपूरमधील अशांततेच्या वातावरणासारखी स्थिती पुण्यात असती, तर आयोगाचे म्हणणे मान्य केले असते. परंतु, पुण्यात मणिपूरसारखी स्थिती होती का की त्यामुळे ही पोटनिवडणूक घेणे आयोगाला खूपच कठीण होते, अशी विचारणाही न्यायमूर्ती पटेल आणि न्यायमूर्ती खाता यांच्या खंडपीठाने आयोगाकडे केली होती. दुसरीकडे, ही पोटनिवडणूक आता घेण्यात आली तरी विजयी उमेदवाराला फारच कमी काळ खासदारकी मिळेल, असा दावा आयोगातर्फे करण्यात आला होता. त्यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी आक्षेप घेतला. तसेच. पुणे लोकसभा मतदारसंघातील पद रिक्त झाल्यानंतरही आयोगाने इतर ठिकाणच्या पोटनिवडणुका घेतल्याकडे याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाचे लक्ष वेधले होते. न्यायालयानेही त्याची दखल घेतली होती. तसेच, मोर यांना हा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्याचे आदेश देऊन प्रकरणाची सुनावणी बुधवारी ठेवली होती. या पार्श्वभूमीवर बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या सगळ्या मागण्या मान्य करत असल्याचे सांगून याचिका निकाली काढली.

# सरकारच्या दबावामुळे राजीनामासत्र!

## मागासवर्ग आयोग अध्यक्षांच्या पदत्यागानंतर माजी सदस्यांसह विरोधकांचा आरोप

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्य मागासवर्ग आयोगाच्या तीन सदस्यांपाठोपाठ अध्यक्ष न्या. आनंद निरगुडे यांनी दिलेल्या राजीनाम्याचे मंगळवारी तीव्र पडसाद उमटले. राज्य सरकारच्या दबावामुळे हे राजीनामासत्र सुरू असल्याचा आरोप माजी सदस्यांनी केला असून, विरोधकांनीही सरकारला लक्ष्य केले. गेल्या अनेक दिवसांपासून राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा असलेले महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष, निवृत्त न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे राजीनामा दिला. गेल्या काही दिवसात विविध कारणांमुळे राज्य मागासवर्ग आयोगाच्या तीन सदस्यांनी राजीनामा दिला आहे. त्यामध्ये प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांनी कामाचा वाढता व्याप असल्याचे कारण दिले, तर ॲड. बी. एस. किल्लारीकर आणि प्रा. लक्ष्मण हाके यांनी राज्य सरकारवर विविध आरोप करत राजीनामे दिले. या राजीनामासत्रात आता आयोगाच्या अध्यक्षांची भर पडली आहे. निरगुडे यांनीही शासकीय हस्तक्षेपामुळे त्रस्त होऊन राजीनामा दिल्याचा दावा ॲड. किल्लारीकर यांनी केला. 'आरक्षणासाठी स्थापन केलेल्या मंत्री गटाचे प्रमुख मंत्री, एक उपमुख्यमंत्री (आणि शासकीय सल्लागार मंडळाचे प्रमुख निवृत्त न्यायाधीश यांचा वाढता अनावश्यक हस्तक्षेप आणि दबाव झुगारून आयोगातील सदस्यांपाठोपाठ अध्यक्षांनीसुद्धा राजीनामा देणे पसंत केले', असे किल्लारीकर म्हणाले. आयोगाचे सदस्य चंद्रलाल मेश्राम यांनीही असाच सूर लावला. 'आनंद निरगुडे यांनी राजीनामा देण्याचे कारण सांगितले नसले तरीही काही तरी कारण निश्चित असेल. त्यांना मुख्यमंत्री वारंवार बोलवायचे. ही बाब त्यांनी आमच्यासमोर बोलून दाखवली होती. त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ केवळ तीन महिने शिल्लक असताना त्यांनी हा निर्णय का घेतला, हे न समजण्यासारखे आहे' असे चंद्रलाल मेश्राम यांनी मंगळवारी विधानभवन परिसरात पत्रकारांशी बोलताना सांगितले. विधानसभेत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे राज्य मागासवर्गीय आयोगाचे



अध्यक्ष, सदस्यांनी दिलेल्या राजीनाम्याचा मुद्दा उपस्थित केला. या पदाधिकाऱ्यांवर कोणाचा दबाव होता, सरकारमधील कोणी त्यात हस्तक्षेप केला, याबाबतची माहिती सभागृहाला मिळावी, अशी मागणी त्यांनी केली. राज्य मागासवर्ग आयोग हा ओबीसी रक्षणासाठी आहे. हा आयोग स्वायत्त आहे. ४ डिसेंबरला आयोगाचे अध्यक्ष निरगुडे यांनी राजीनामा दिला. ९ तारखेला राजीनामा स्वीकारला, पण सरकारने तो दाबून ठेवला होता. स्वायत्त आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा देण्याआधी तीन सदस्यांनी राजीनामा दिला. आमच्यावर दबाव आणला जातो, असा आरोप सदस्यांनी केला असून, त्याबाबत खुलासा करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली. मंत्री शंभूराज देसाई यांनी मात्र विरोधकांचे आक्षेप फेटाळून लावले. आयोगाचे अध्यक्ष वा सदस्यांनी सरकारच्या दबावाबाबत कोणताही आरोप केलेला नसल्याचा दावा देसाई यांनी केला. 'महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्य मागासवर्ग आयोगावर नियुक्त्या करताना तिन्ही राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची आयोगावर सदस्य म्हणून वर्णी लावण्यात आली होती. आम्ही मागासवर्ग आयोग तयार केला, तेव्हा त्यात अभ्यासक घेतले होते. महाविकास आघाडी सरकारने त्यात कार्यकर्त्यांचा भरणा केला. किल्लारीकर यांनी मागासवर्ग आयोगाचा राजीनामा दिल्यावर आधी शरद पवार यांची भेट घेतली. मराठा आरक्षणाचा विषय पूर्णत्वास जाऊ नये आणि तो तसाच खोळंबलेल्या स्थितीत राहावा, अशी ज्या लोकांची इच्छा आहे, तेच यांचे राजकीय सूत्रधार आहेत', असा आरोप फडणवीस यांनी केला. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेलाच संक्षिप्त स्वरूपाच्या सर्वेक्षणाचे काम देण्याचा आग्रह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धरल्याचा आरोप ॲड. किल्लारीकर यांनी केला. सर्वेक्षणाचे काम गोखले इन्स्टिट्यूटलाच का, असा प्रश्न आयोगाच्या १८ नोव्हेंबरच्या बैठकीत उपस्थित करणाऱ्या सदस्यांना २२ नोव्हेंबरपासून विविध कारणास्तव नोटीस बजावण्यास सुरुवात करण्यात आली, असेही किल्लारीकर म्हणाले. 'आता शिंदे सरकार एखाद्या जातीला आरक्षणाचा तात्पुरता दिलासा देऊन लोकसभा निवडणुकीत मतांची पोळी भाजण्यासाठी 'फडणवीस पटर्न' स्वीकारणार का?' असा सवालही किल्लारीकर यांनी केला. 'किल्लारीकर पॅटर्न'राज्यातील आरक्षणाचे ज्वलंत प्रश्न, कायमस्वरूपी आणि शास्त्रोक्त पद्धतीने सोडविण्यासाठी आयोगाचा सदस्य म्हणून मी अभ्यासपूर्ण प्रस्ताव दिला होता. या 'किल्लारीकर पॅटर्न'नुसार राज्यातील सर्व समाज घटकांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती कशी आहे, याचे सर्वेक्षण करून 'शास्त्रशुद्ध' माहिती आधारे, सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे तुलनात्मक अभ्यास करून, मराठा आरक्षणासह सर्व प्रश्न सोडवले गेले असते. जाती-जाती मधील तणाव संपवण्यासाठी मदत झाली असती, असेही ॲड. किल्लारीकर यांनी स्पष्ट केले. ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गासाठीचे आरक्षण रद्द करण्यात यावे, या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेत उच्च न्यायालयाने आदेश देऊनही आयोगाच्या वतीने १८ नोव्हेंबरच्या बैठकीत अंतिम करण्यात आलेले शपथपत्र सदस्य सचिवांनी आजपर्यंत दाखल केलेले नाही. उलट राज्य सरकारला सोयीस्कर ठरेल, असे नवीन शपथपत्र सरकारकडून बनवून घेतले जात आहे. यावरून आयोगाच्या २१ नोव्हेंबर आणि १ डिसेंबरच्या बैठकीत खडाजंगी झाली होती, असे ॲड. किल्लारीकर म्हणाले.

# डेक्कन परिसरातील झाडे बोलू लागली?

## राज्य सरकारने आनंद निरगुडे यांचा राजीनामा स्विकारला

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाने शहरातील डेक्कन परिसरातील झाडांना बोलके केले आहे. विद्यार्थी आणि समाजाला वनस्पतींबाबत जागरूक करण्याच्या उद्देशाने हा अनोखा उपक्रम हाती घेण्यात आला असून, त्या अंतर्गत झाडांवर चिकटवलेले क्यूआर कोड मोबाइलद्वारे स्कॅन केल्यावर वनस्पतींची माहिती वाचता, ऐकता येणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या संकल्पनेतून झाडांना बोलके करण्याचा नाविन्यपूर्ण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमात वनस्पतीशास्त्र विभागातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी डेक्कन परिसरातील जंगली महाराज रस्ता, गोपाळकृष्ण गोखले रस्ता, आपटे रस्ता, घोले रस्ता येथील विविध वनस्पतींच्या प्रजातींचे सर्वेक्षण केले.

या सर्वेक्षणात ४५ पेक्षा जास्त प्रजातींची एकूण ७०० पेक्षा जास्त झाडे आढळली. दुसऱ्या टप्प्यात या वनस्पतींना बोलके करण्यासाठी वनस्पतींचे शास्त्रीय नाव, प्रचलित नाव, छायाचित्र अशी माहिती संकलित करून ती श्राव्य स्वरुपात संकेतस्थळावर आणण्यात आली. त्यानंतर ही माहिती क्यूआर कोडला जोडण्यात आली. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात हे क्यूआर कोड झाडांची कोणतीही हानी होऊ न देता झाडांवर चिकटवण्यात आले. या उपक्रमात वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नीता पाटील, डॉ. राजकुमार बारमुख, डॉ. यू. आर. वायसे, डॉ. आरती गोग्गी यांच्यासह ओम सोनटक्के, राम चितळे, सुरेश तेले, पार्थ झेंडे, अंजली धोटे, कोमल बेनगुडे, जान्हवी वाघोलीकर, सायली सोनवणे, शिवानी मोरे, श्रावणी यादव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, की वनस्पतींचे आपल्या आणि समाज जीवनातील अविभाज्य स्थान अधोरेखित करण्याच्या उद्देशाने झाडांना बोलके करण्याची कल्पना प्रत्यक्षात आणली. सुरुवातीला एकूण २७० झाडांना क्यूआर कोड चिकटवण्यात आले आहेत. पुढील टप्प्यात संचेती रुग्णालयापासून छत्रपती संभाजी पूल, कृषी महाविद्यालय अशा परिसरातील झाडांची माहिती तयार करून त्यांचे क्यूआर कोड झाडांना चिकटवले जाणार आहेत.